नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 15/02/2021 (सोमवार)
(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 03 कि. मी. वारंगा लॉकॉलेज युनिव्हर्सिटी येथे दिनांक 14/02/2021 चे 08.30 वा. ते 09.00 वा. दरम्यान मृतक नामे– बिनोता बिबास बिस्वास, वय 02 वर्ष, रा भुगाव ता. कामठी ही बांधकाम सुरू असलेल्या परिसरात खेळत असता परिसरात सांडपाणी साचविण्याकरिता खोदलेल्या गडडयात अचानक पडली आणि गडयात साचलेल्या पाण्यात बुडाली. तिला माया हॉस्पीटल बुटटीबोरी येथे उपचाराकामी दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रमेश श्यामराव भोयर वय 46 वर्ष, रा. बोरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार धवराळ 9765497005 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 02 कि. मी. प्लॉट नं. 51, राठी लेआउट धंतोली काटोल येथे दिनांक 30/01/2021 चे 18.00 वा. दरम्यान सौ. वैशाली विनायक वाचासंदूर (मृतक)वय 71 वर्ष रा प्लॉट नं 51 राठी लेआउट धंतोली काटोल या आपल्या राहते घरी दिवाबत्ती करीत असतांना आगपेटीची काडी अचानक त्यांच्या साडीवर पडल्याने साडी पेटल्याने त्या 40 ते 45 टक्यानी जळाल्याने त्यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी पोउपनि एस बी सोनोने पो.स्टे. अंबाझरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक संतोष आंधळे 8380833424 हे करीत आहे.

3) पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत 20 कि. मी. मौजा सिंदी शिवार नरखेड येथे दिनांक 13/02/2021 चे 14.00 वा. दरम्यान भगवान घोडया मरकाम(मृतक), वय 48 वर्षे, रा. उमरी सिंधी हा विहीरीचे पाण्यावरील कचरा काढण्याकरीता विहीरीतील मोटारीचे पाईपाला धरून विहीरीत उतरत असता पाईपावरून हात स्लिप झाल्याने तो विहीरीच्या पाण्यात पडल्याने त्याचा पाण्यात बुडुन मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– श्रीमती नर्मदा भगवान मरकाम, वय 45 वर्षे, रा. सिंदी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा धनराज भुक्ते हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर